# ‘राजारामबापूंचे कार्य लोकशिक्षणाचे’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘राजारामबापू पाटील यांनी आयुष्यभर लोकशिक्षणाचे काम केले. पदयात्री म्हणून ते राज्याला परिचित होते. त्यांनी तरुण कार्यकर्त्यांना नेहमीच प्रोत्साहन दिले. सहकार चळवळीतील त्यांचे योगदान मोठे आहे. सहकारच्या माध्यमातून समाज बांधणीचे काम आदर्शवत आहे. ते आमचे आयकॉन होते’ असे प्रतिपादन माजी आमदार शरद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमार्फत मानव्यशास्त्र सभागृहात ‘राजारामबापू पाटील आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळ’ या विषयावर शनिवारी एकदिवसीय चर्चासत्र झाले. विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी होते.

माजी आमदार पाटील यांनी राजारामबापूंविषयीच्या आठवणींना उजाळा दिला.

अमेरिकेतील जेम्स मॅडिसन युनिव्हर्सिटीतील महात्मा गांधी अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. टेरी बेटझील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. डॉ. बेटझील म्हणाले, ‘महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्य, ग्रामोद्योग, पर्यावरण, आरोग्य, सर्वधर्मसमभावा या संदर्भातील विचार आजही सुसंगत आहेत.’

ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले, पत्रकार विजय चोरमारे यांची भाषणे झाली. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. प्रा. चंद्रकांत लांगरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलम जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गजानन साळुंखे यांनी आभार मानले. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. तानाजी घागरे, मृणाली जगताप, उर्मिला दशवंत आदी उपस्थित होते.

# करोना संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन करणे टाळा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## वैद्यकीय अधिकारी डॉ. रानडे यांचे आवाहन

करोना विषाणूचे संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन करणे, मिठी मारणे, गर्दीच्या ठिकाणी जाणे, प्रवास करणे टाळावे. साबणाच्या पाण्याने हात स्वच्छ धुवून घ्यावेत. कार्यालयीन कामाची ठिकाणे नेहमी स्वच्छ व सुरक्षित राहतील यासाठी दक्ष असले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी येथे केले.

विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामार्फत करोना विषाणू आजारासंदर्भात प्रतिबंध व नियंत्रण याबाबतची सर्वसाधारण माहिती विद्यापीठातील अधिविभागप्रमुख, अधिकारी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना होण्यासाठी शाहू सिनेट सभागृहामध्ये आयोजित केलेल्या मार्गदर्शनपर बैठकीमध्ये त्या बोलत होत्या.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते. डॉ. रानडे म्हणाल्या, 'सर्दी होणे, शिंका येणे, घशात खवखवणे, खोकला येणे, निमोनिया होणे ही लक्षणे आहेत. सर्दी, थकव्याचा त्रास जाणवत असल्यास त्वरित उपचार करून विश्रांती घेणे गरजेचे आहे. दिवसातून तीन ते चार लिटर पाणी पिणे आवश्यक आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी कार्यालयात बैठकीसाठी बाहेरून येणाऱ्या लोकांचा संपर्क क्रमांक नोंदवून ठेवणे गरजेचे आहे. कार्यालयीन कामानिमित्त बाहेरगावी आयोजित होणाऱ्या बैठकांना सध्या तरी जाणे टाळावे. बैठकीच्या कामाची माहिती दूरध्वनीवरून घेणे योग्य होईल.' यावेळी विद्यापीठातील अधिविभागप्रमुख, शिक्षक व प्रशासकीय सेवक उपस्थित होते.



कोल्हापूर : शहाजी लॉ कॉलेज येथे पदवीदान समारंभात तन्वी शेखला प्रमाणपत्र देताना न्यायाधीश वृषाली जोशी. सोबत रंजनीताई मगदूम आदी.

# फाईव्ह इयर लॉमध्ये विद्यापीठात तन्वी शेख प्रथम

**कोल्हापूर** : शहाजी लॉ कॉलेजची विद्यार्थिनी तन्वी रहेमान शेख हिने २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या फाईव्ह इयर लॉ अभ्यासक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला.

शहाजी लॉ कॉलेजमध्ये पदवीदान समारंभात मुख्य जिल्हा न्यायाधीश वृषाली जोशी यांच्या हस्ते तन्वीला एलएल.बी. पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी निश्चित ध्येय ठेवून वाटचाल करावी, असे आवाहन वृषाली जोशी यांनी केले.